**फौ.कि.अ.क्र.८९/२०२५**

**संध्या संसारे –वि– सुप्रिया संसारे व २**

**निशाणी क्र.**

**अर्जदार/फिर्यादी संध्या मधूकर संसारे यांची शपथेवर पडताळणी पुढीलप्रमाणे सुरु**

**नावः संध्या मधूकर संसारे**

**वयः ५४**

**धंदाः घरकाम**

**राहः मनमाड, ता. नांदगाव, जि. नाशिक.**

१. सा.वाला क्र. १ ही माझी सुन आहे. माझा मुलगा सतिष मधूकर संसारे व त्याची पत्नी लग्नानंतर काही दिवसांनी आमच्यापासून विभक्त राहत होते. त्या दोघांना सदर लग्नबंधनातून एक मुलगी–संबोधी(सध्या वय–६ वर्षे) झाली. संबोधीच्या जन्मानंतर मी, माझे पती, नात संबोधी, माझा मुलगा सतिष व सा.वाला क्र. १ असे एकत्र राहत होतो.

२. माझा मुलगा सतिष दि.०४.०४.२०२१ रोजी कोरोनामुळे निफाड येथे मरण पावला. त्यानंतर माझी सुन म्हणजेच सा.वाला क्र. १ आमची नात संबोधीला घेऊन तिच्या माहेरी निघून गेलेली आहे व तेव्हापासून ती संबोधीला घेऊन तिच्या माहेरीच राहत आहे. त्यानंतर आम्ही नातीला भेटण्याचा प्रयत्न केला. मात्र सा.वाला क्र. १ व तिचा भाऊ सा.वाला क्र. २ यांनी मला वाईट साईट शिवीगाळ केली. तसेच मारहाण केली व पुन्हा येथे आला तर तुमचे हातपाय तोडून विहीरीत टाकून देऊ असे मला व माझ्या पतीला दम दिला. त्यामुळे माझ्या पतीने त्या दोघांच्याविरुद्ध चांदवड पो.स्टेशनला एन.सी. नं. १०४६/२०२२ दाखल केली.

३. आम्हाला आमची नात संबोधी ही एकटीच आसरा असल्यामुळे आमचे तिच्यावर अतोनात प्रेम आहे. त्यामुळे आम्हाला तिला भेटू द्यावे अशी आम्ही सा.वाला क्र. १ ला विनंती केली. मात्र तिने आमचे काहीही ऐकले नाही. मी व माझे पती मधूकर संसारे यांनी जिल्हा व सत्र न्यायालय, निफाड यांच्या न्यायालयात नातीचा ताबा मिळण्यासाठी अर्ज नं. ५९/२०२२ दाखल केलेला होता. त्याचा निकाल दि.२६.०३.२०२५ रोजी झालेला असून मला व माझ्या पतीला आमची नात संबोधी हिला प्रत्येक महिन्याच्या २ ऱ्या व ४ थ्या रविवारी सकाळी ११ ते संध्याकाळी ५ पर्यंत भेटण्याची परवानगी दिलेली आहे. सदर आदेशाची माहिती सा.वाला क्र. १ व २ दोघांनाही आहे.

४. सदर आदेशानुसार मी व माझे पती नातीला भेटण्यासाठी गेलो असता सा.वाला क्र. १ व २ यांनी मला दम दिला की, आमच्या गावात नातीला भेटण्यासाठी यायचे नाही असे म्हणून आम्हाला शिवीगाळ केली, धक्काबुक्की केली व जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे मी दि.२०.०४.२०२५ रोजी सा.वाला क्र. १ व २ विरुद्ध चांदवड पो.स्टेशनला एन.सी.नं. ४१३/२०२५ दाखल केली.

५. मा. सत्र न्यायालय निफाड यांचा आदेश असून देखील सा.वाले मला व माझ्या पतीला आमची नात संबोधीला भेटू देत नाहीत. त्यामुळे मी दि.२२.०६.२०२५ रोजी माझ्या नातेवाईकांसोबत नातीला भेटण्यासाठी नन्हावे ता. चांदवड येथे गेलो असता आम्हाला सा.वाला क्र. १ ने शिवीगाळ केली व सा.वाला क्र. २ ने धक्काबुक्की केली व त्या दोघांनी मला व माझ्या नातेवाईकांना पुन्हा येथे आलात तर तुमचा बेत पाहू अशी धमकी दिली. त्यामुळे मी त्या दोघांविरुद्ध दि.२२.०६.२०२५ रोजी चांदवड पो.स्टेशनला एन.सी.क्र. ६५५/२०२५ दाखल केली. मात्र त्यावर पोलीसांनी काहीही ठोस कारवाई केली नाही. त्यामुळे मी सदरची लेखी तक्रार न्यायालयात दाखल केलेली आहे.

६. मी सा.वाल्यांविरुद्ध पो.स्टेशनला अनेकदा तक्रारी देऊन देखील ते कोणतीही कार्यवाही करत नाहीत. सा.वाले वारंवार आम्हाला शिवीगाळ, मारहाण करतात व जिवे मारण्याची धमकी देतात. त्यामुळे त्यांच्या या बेकायदेशीर कृत्याबाबत त्यांच्याविरुद्ध आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करुन आम्हाला न्याय द्यावा ही माझी विनंती आहे.

याव्यतिरिक्त मला काही सांगायचे नाही.

साक्षीदाराची सही–

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.11.26 15:08:02 +0530

**दि. २६.११.२०२५**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**